2 9 MAR 2022 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ...तर चक्रीवादळांसह अवकाळी पाऊस

## शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यशाळेतील सूर

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** दुर्लक्ष केल्यास नजीकच्या काळात तापमानवाढीचे गंभीर दुष्परिणाम भोगावे लागतील. चक्रीवादळे, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि पाण्याचे दुर्भिक्ष. अशी संकटे येत राहतील, असा सूर शिवाजी विद्यापीठातील चर्चेत सोमवारी उमटला. बँक ऑफ इंडिया अध्यासन व राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांच्यातर्फे 'नेट झिरो एमिशन : ए ग्लोबल नेसेसिटी' या विषयावरील एकदिवसीय व्यवस्थापन विकास कार्यक्रमात (कार्यशाळा) तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.




शिवाजी विद्यापीठात सोमवारी आयोजित केलेल्या व्यवस्थापन विकास कार्यक्रमाचा समारोप प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. यावेळी सुभाष आठल्ये, मधुकर बाचुळकर, शशिकांत दळवी, राजन पडवळ, आदी उपस्थित होते.

शून्य उत्सर्जन साध्य करण्यासाठी जगभरात प्रयत्न सुरू आहेत. असे प्रयत्न स्थानिक पातळीवर व्हावेत. त्यांना सहकार्य राहील, अशी ग्वाही प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी दिली. ग्लासगो परिषदेत झालेल्या चर्चेनुसार २०७० पर्यंत 'नेट झिरो एमिशन' साध्य करण्यासाठी काय करावे लागेल, या दृष्टीने डॉ. सुभाष आठल्ये, डॉ. मधुकर बाचुळकर, कर्नल शशिकांत दळवी यांनी केले. वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांनी उद्घाटन केले. विश्व वन्यजीव निधीचे सुहास वायंगणकर, ग्राहक प्रबोधन प्रचार प्रांत समिती प्रमुख सचिन जंगम, दिनकर चौगुले, विश्वास पवार, डॉ. सीमा देसाई, प्रा. अनिकेत परदेशी, अर्जुन थोरात, कमलाकर बुरांडे उपस्थित होते. डॉ. राजन पडवळ यांनी आभार मानले.

लोकमत

# अण्णा भाऊ साठेंवरील पुस्तकाचे आज प्रकाशन

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात लक्ष्मण भानुदास साठेलिखित 'अण्णाभाऊ साठे यांच्या लेखनाचे पैलू' या संशोधनात्मक पुस्तकाचे प्रकाशन आज, मंगळवारी सकाळी साडेअकरा वाजता ज्येष्ठ विवेकवादी विचारवंत प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते होणार आहे. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी हॉलमधील होणाऱ्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के असतील. अण्णा भाऊ साठे अध्यासन आणि मराठी अधिविभागाने या कार्यक्रमांचे आयोजन केल्याचे अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी सांगितले.

लोकमत



शिवाजी विद्यापीठात डॉ. उमेश गडेकर संपादित पुस्तकाचे प्रकाशन डॉ. राजन गवस व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी केले. यावेळी डॉ. संतोष सुतार, डॉ. गडेकर, डॉ. प्रकाश पवार व गजानन साळुंखे उपस्थित होते.

# यशवंतरावांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनेक पैलू अप्रकाशित : गवस

## उमेश गडेकर संपादित पुस्तकाचे प्रकाशन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** यशवंतराव चव्हाण यांचे व्यक्तिमत्त्व सामाजिक, राजकीयच्या पलीकडे साहित्यिक व सांस्कृतिक-दृष्ट्या सजग व प्रगल्भ होते. तरुण पिढीने यशवंतराव चव्हाण यांच्या या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाचा सर्वंकष वेध घेण्याचा प्रयत्न करायला हवा, अशी अपेक्षा ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी व्यक्त केली.

ते शिवाजी विद्यापीठाचे यशवंतराव चव्हाण अध्यासन आणि यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट यांच्यातर्फे 'कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण व हमीद अली' या डॉ. उमेश गडेकर यांनी संपादित केलेल्या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील होते.

डॉ. गवस म्हणाले, यशवंतराव चव्हाण यांचे देशबांधणीच्या कार्यातील योगदान व सर्वसमावेशक विकासाची तळमळ यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. त्यांनी घेतलेला नादारीचा निर्णय खेड्यातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सशक्तीकरण करणारा ठरला व त्यामुळे स्त्री साक्षरता शक्य झाली, ही बाब अभिमानपूर्वक स्वीकारायला हवी. डॉ. गडेकर यांनी संपादित पुस्तकात यशवंतरावांच्या अशा काही पैलूंवर चांगला प्रकाश टाकला आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, कर्मवीर अण्णांनी ग्रामीण भागात शैक्षणिक संकुलाचे जाळे निर्माण केले, त्याचप्रकारे यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण विकासाचा पाया मजबूतीचा प्रयत्न केला. हमीद अली यांनी कर्मवीर अण्णांच्या रयत शिक्षण संस्थेला मोठे सहकार्य केले. यावेळी प्रभारी संचालक डॉ. प्रकाश पवार, डॉ. उमेश गडेकर, प्रा. गजानन साळुंखे, डॉ. नितीन माळी, चेतन गळगे, सुधीर देसाई, डॉ. संतोष सुतार, अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिबिरामुळे नेतृत्वगुणांचा विकास : प्रा. जायभाये

**गडहिंग्लज : प्रतिनिधी**

श्रमसंस्कार शिबिरातून विद्यार्थ्यांना मिळणारा आनंद, आत्मिक बल, समाज घडविण्याचे सामर्थ्य, व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंचा आणि नेतृत्वगुणांचा विकास होत असतो, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. अभय जायभाये यांनी केले. उत्तूर (ता. आजरा) येथे ओंकार शिक्षण प्रसारक मंडळ संचालित, कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय गडहिंग्लजमधील राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिराच्या सदिच्छा भेटीप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे माजी जिल्हा समन्वयक डॉ. ज्ञानराजा चिघळीकर, ग्रा.पं. सदस्य महेश करंबळी, प्रा. एस. टी. खोचारे, डॉ. महेंद्र जाधव, विजय पाटील व स्वयंसेवक उपस्थित होते. डॉ. काशीनाथ तनंगे यांनी प्रास्ताविक केले. शर्वरी पाटील हिने आभार मानले.

तरूण भारत

# आजरा महाविद्यालयाच्या खेळाडूंचे राष्ट्रीय स्पर्धेत यश



अभिषेक देवकाते



सिद्धांत पुजारी



ज्योती सुतार

प्रतिनिधी
आजरा

येथील आजरा महाविद्यालयाच्या खेळाडूंनी राष्ट्रीय स्पर्धेमध्ये यश संपादन केले. यामध्ये अभिषेक देवकाते याने कोहीमा नागालँड येथे पार पडलेल्या अखिल भारतीय २० वर्षाखालील क्रॉस क्रंट्री स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य प्राप्त केले. रामराजे कॉलेज, जत येथे झालेल्या राज्य अंजिक्य निवड चाचणी स्पर्धेमधून त्यांची या स्पर्धेसाठी निवड झाली होती.

सिद्धांत पुजारी याने मंगलोर येथे अखिल भारतीय क्रॉस कंट्री स्पर्धेमध्ये शिवाजी विद्यापीठात समाविष्ठ होवून कांस्यपदक पटकाविले. व खेलो इंडिया क्रॉस कंट्री स्पर्धेमध्ये निवड झाली आहे. महाविद्यालयाची तलवारबाज खेळाडू ज्योती अरूण सुतार हिला गुरू नानक देव विद्यापीठ अमृतसर येथे पार पडलेल्या अखिल भारतीय फेन्सिंग स्पर्धेमध्ये फॉइल क्रीडा प्रकारामध्ये महाराष्ट्र महिला संघातून खेळत कास्य पदक प्राप्त केले. तिची निवड औरंगाबाद येथे पार पडलेल्या राज्य संघ निवड चाचणी मधून महाराष्ट्र संघामध्ये करण्यात आली होती. या विद्यार्थ्यांना संस्थेचे अध्यक्ष अशोक चराटी यांच्यासह संचालक मंडळाचे प्रोत्साहन लाभले.